# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**


**एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/माहिती/ २०६२ /२०१६ दिनांक २२/०८/२०१६

## परिपत्रक

**विषय :-माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी तसेच कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिकेतील तरतुदींचे पालन करणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.रामाआ/माहिती कलम ४(१)/प्र.क्र. २६/२०१५/आस्था/५७१३, दि. १६/०८/२०१६(प्राप्त दि. २०/०८/२०१६)

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र. २९/१८ (र. व का.), दिनांक १०/०२/२०१६

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठास संदर्भीय पत्र क्र. १ प्राप्त झाले असून सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयाशी संबधीत माहिती संदर्भीय पत्र क्र. २ च्या परिपत्रकाद्धारे पत्रे निर्गमित करताना पत्रावरील स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नांव व पदनामाचा उल्लेख करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. त्यास अनुसरून मा. आयोगाकडे पत्रव्यवहार करतांना माहिती अधिकाऱ्यांनी व अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यांचे नाव व पदनाम नमुद करण्याच्या सुचना आपल्या अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना देण्याबाबत संदर्भाधिन पत्राद्धारे कळविण्यात आले आहे.

त्याअनूषंगाने संदर्भीय पत्र क्र. १ नुसार माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

(डॉ. विनायक ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- संदर्भीय पत्र क्र. १ संलग्नित.

प्रतिलिपी :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालय

२) विद्यापीठातंर्गत सर्व विभाग प्रमुख.

E:\Right of information act under matter 2016\RTI-201/15

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

**दूरध्वनी क्रमांक-०७१२-२५६६८१६**

क्रमांक -रामाआ/माहिती कलम ४(१) /प्र.क्र.२६/२०१५/आस्था/५६९३    दिनांक-१६/०८/२०१६

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ७७३ दि. १९/८/१६
जावक क्र. ४०६८ दि. १९/८/१६

प्रति,
विभागीय आयुक्त(महसूल), नागपूर विभाग, नागपूर
जिल्हाधिकारी, नागपूर/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/भंडारा/गोंदिया
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नागपूर/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/भंडारा/गोंदिया
आयुक्त,नागपूर महानगर पालिका, नागपूर
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठ, नागपूर
कुलसचिव, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 4240 दि. 20-8-16
जावक क्र. ........ दि. ........

**विषय- माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ची अंमलबजावणी तसेच कार्यालयीन कामकाज नियमपुस्तिकेतील तरतूदीचे पालन करणेबाबत...**

**संदर्भ- १.या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक १५.०२.२०१६ चे पत्र**

**२.सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परीपत्रक क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.२२/१८(र. व का.), दिनांक १०.०२.२०१६**

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भांकित क्रमांक २ च्या परीपत्रकाद्वारे पत्रे निर्गमित करतांना पत्रावरील स्वाक्षरी करणा-या अधिका-याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नांव व पदनामाचा उल्लेख करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्यास अनुसरुन मा. आयोगाकडे पत्रव्यवहार करतांना माहिती अधिका-यांनी व अपीलिय अधिका-यांनी त्यांचे नाव व पदनाम नमूद करण्याच्या सूचना आपल्या अधिनस्थ सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना देण्याबाबत संदर्भांधिन पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तथापी अद्यापही तशी कार्यवाही केल्या जात नाही असे निदर्शनास येते, त्यामुळे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांस देण्यात याव्यात.

१) मा. आयोगाकडे पत्रव्यवहार करतांना तसेच अर्जदारास माहिती देतांना माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे नाव व पदनाम व दूरध्वनी क्रमांक पत्रामध्ये न चूकता नमूद करावा.

२) माहिती अधिकारातंर्गत जी माहिती अर्जदारास दिली जाते, त्यावर माहितीच्या अधिकारातंर्गत माहिती दिल्याबाबतचा शिक्का असणे आवश्यक आहे.

३) वर नमूद केलेल्या बाबींची पूर्तता होत नसल्यास ती माहिती , माहिती अधिकारातंर्गत दिलेली असल्याचे गृहीत धरल्या जाणार नाही.

Shri Bobade

--२--

वर नमूद केल्याप्रमाणे सूचना आपल्या अधिनस्त सर्व प्राधिकरणांना कृपया देण्यात याव्यात.

आपला,

(मु. प्र. देशपांडे)
उपसचिव,
राज्य माहिती आयोग, नागपूर.